**प्रेसनोट दि.३०.१२.२०२४**

आरोपी १) श्री. उमेश मारूती बोरकर, वय-३७ वर्षे, व्यवसाय- निदेशक (शिक्षक) हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल नरवाड, वर्ग-३ रा. २११ अर्जुन द बोरकर, यादव गल्ली, कवठेएकंद, ता.तासगाव, जि.सांगली, आरोपी २) श्री. युवराज मनोहर कांबळे, वय-५५ वर्षे, व्यवसाय- ज्युनियर क्लार्क, हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल सोनी, वर्ग-३ रा. बौध्द वसाहत, बेडग, ता.मिरज, जि.सांगली यांनी १,१०,०००/- रुपये लाचेची मागणी केलेबाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांची पत्नी हिचे थकीत पगार बिलाची रक्कम करमुसे अधीक्षक व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजुर करणेसाठी आरोपी क्र.१) श्री.उमेश बोरकर यांनी करमुसे अधीक्षक यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे थकीत पगार बिलाचे ६ टक्के प्रमाणे लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. १४.११.२०२४ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२८.११.२०२४ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये यातील आरोपी १) श्री. उमेश मारूती बोरकर, वय-३७ वर्षे, व्यवसाय- निदेशक (शिक्षक) हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल नरवाड, वर्ग-३ यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांची पत्नी माधवी जोशी यांचे थकीत पगार बिलाची रक्कम करमुसे अधीक्षक व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजुर करणेसाठी लोकसेविका श्रीमती करमुसे अधीक्षक यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती १,१०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असून आरोपी क्र.२) श्री. युवराज मनोहर कांबळे, वय-५५ वर्षे, व्यवसाय- ज्युनियर क्लार्क, हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल सोनी, वर्ग-३ यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने आरोपी क्र.१ यांचे लाच मागणीवेळी प्रत्यक्ष हजर राहून आरोपी क्र.१ व तक्रारदार यांचे चर्चेमध्ये सहभाग घेवून तक्रारदार यांनी लाच रक्कम आरोपी क्र.१ यांना देणेकरीता प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न झाले.

त्या अनुषंगाने आरोपी १) श्री. उमेश मारूती बोरकर, वय-३७ वर्षे, व्यवसाय- निदेशक (शिक्षक) हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल नरवाड, वर्ग-३ रा. २११ अर्जुन द बोरकर, यादव गल्ली, कवठेएकंद, ता.तासगाव, जि.सांगली, आरोपी २) श्री. युवराज मनोहर कांबळे, वय-५५ वर्षे, व्यवसाय- ज्युनियर क्लार्क, हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल सोनी, वर्ग-३ रा. बौध्द वसाहत, बेडग, ता.मिरज, जि.सांगली यांचेविरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४७३/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७(अ) व १२ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. शिरीष सरदेशपांडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश दा. पाटील, पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, राधीका माने, धनंजय खाडे, सीमा माने, पोपट पाटील, सलीम मकानदार, अतुल मारे, उमेश जाधव, चंद्रकांत जाधव, चालक विठ्ठल रजपुत यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर वै मोबाईल नंबर ९०८२२६२०९९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

**(उमेश दा. पाटील)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**सांगली.**

Scanned with OKEN Scanner